उप प्रादेशिक परिवहन अधिकारी
पदावर पदोन्नती व पदस्थापना .

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन निर्णय क्रमांकः एमव्हीडी ०८१७/प्र.क्र.२१५ /परि-४
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: ३० डिसेंबर २०१७

शासन निर्णय :-

मोटार वाहन विभागातील खालील ९ सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना विभागीय पदोन्नती समितीने मान्य केलेल्या निवडसूचीनुसार "उप प्रादेशिक परिवहन अधिकारी" या पदावर रु.९३००-३४८०० (ग्रेड पे रु.४८००) या सुधारीत वेतन संरचनेत तात्पुरत्या व तदर्थ स्वरूपात खालील अटींच्या अधीन राहून पदोन्नती देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे :-

१) सदर अधिकाऱ्यांची पदोन्नती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची राहील व वरिष्ठ संवर्गात ज्येष्ठतेकरीता ग्राह्य धरता येणार नाही. त्या संवर्गात वेतनाव्यतिरिक्त अन्य कोणतेही लाभ मिळणार नाहीत.

२) सदर पदोन्नती केवळ ११ महिन्याकरीता देण्यात येत असून त्यानंतर सदर पदोन्नती चालू ठेवावयाची असल्यास ११ महिन्यांच्या कालावधीनंतर त्या-त्या वेळी खंड देण्यात येईल.

अ.क्र.	ज्येष्ठता क्रमांक	अधिकाऱ्याचे नाव	वाटप केलेला महसूली विभागीय संवर्ग	पदोन्नतीने प्रस्तावित पदस्थापना
१	२१	श्रीमती उर्मिला कां. पवार	कोकण -१	पेण
२	२४	श्री. विश्वंभर नागूराव शिंदे	नागपूर	चंद्रपूर
३	२६	श्री. राजेंद्र भी. वाढोकर	अमरावती	यवतमाळ
४	२८	श्री. अशोक श्री. शिंदे	कोकण-१	सिंधुदुर्ग
५	३२	श्री. नानाजी दौ. बच्छाव	नाशिक	नंदुरबार
६	३६	श्री.कृष्णदेव सु. जाधव	औरंगाबाद	नांदेड
७	४२	श्री. सर्जेराव शि. पवार	औरंगाबाद	जालना
८	४३	श्री. जयसिंग पवार	नाशिक	धुळे
९	४६	श्री. विनोद वैजनाथ चव्हाण	कोकण-१	रत्नागिरी

२. उपरोक्त पदोन्नती ही तदर्थ धर्तीवर व मा. सर्वोच्च न्यायालयातील विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अधिन राहून देण्यात येत आहे. सदर आदेशाने पदोन्नतीचे आदेश बाधीत होणार असल्यास, या आदेशान्वये पदोन्नत झालेल्या अधिका-यांना सेवाज्येष्ठता किंवा आर्थीक फायद्यासंदर्भात मागणी करण्याचा हक्क राहणार नाही.

३. सदर पदोन्नतीनंतरची पदस्थापना सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना दि. २८.०४.२०१५, दि.१६.७.२०१५, दि. १५.६.२०१६ व दि.१९.७.२०१७ मधील संवर्ग वाटपाच्या तरतुदीनुसार करण्यात आली आहे.

४. संबंधित नियंत्रक अधिकाऱ्यांनी वरील अधिकाऱ्यांना तात्काळ कार्यमुक्त करावे. तसेच पदोन्नती वरील अधिकाऱ्यांनी त्यांच्या पदाचा कार्यभार कार्यालय प्रमुखांचे सल्ल्याने अन्य अधिकाऱ्याकडे सोपवून, तात्काळ कार्यमूक्त व्हावे व पदोन्नतीच्या ठिकाणी तात्काळ कार्यभार स्विकारावा.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१२३०१६३३१३७२२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kadam Dattatray Hanmant

Digitally signed by Kadam Dattatray Hanmant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7fee1bbc15b71aa23bf3ffa4e468df7492703428e9ad65c6cd79299927331e6f, cn=Kadam Dattatray Hanmant
Date: 2017.12.30 18:24:48 +05'30'

(द. ह. कदम)
अवर सचिव, गृह विभाग.

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मंत्री / राज्यमंत्री (परिवहन), मंत्रालय, मुंबई.
३. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) (लेखापरिक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/ नागपूर
४. परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५. सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी (परिवहन आयुक्त कार्यालयामार्फत)
६. सर्व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी (परिवहन आयुक्त कार्यालयामार्फत)
७. सर्व संबंधित सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी.
८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
९. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
१०. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
११. निवडनस्ती (परिवहन-४)